भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५

**(सन १९९५ चा अधिनियम क्रमांक ७)**

[ २६ फेब्रुवारी २००४ रोजी यथाविद्यमान ]

# The Cable Television Network (Regulation) Act, 1995

**( Act No. 7 of 1995 )**

[ *As in force on the 26th February 2004* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन मुंबई यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[**किंमत :** रुपये ११.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ ६४ ते ७० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Cable Television Network (Regulation) Act, 1995 as on the 26th February 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October 2004 on pages 64 to 70.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

कलमे

**प्रारंभिक**


१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.


### प्रकरण दोन

**केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे विनियमन**


३. केबल टेलिव्हिजन नेटवर्कची नोंदणी केल्याखेरीज प्रचलन न करणे.

४. केबल परिचालक म्हणून नोंदणी.

४क. ॲड्रेसेबल यंत्रणा इत्यादीमार्फत कार्यक्रमाचे पारेषण.

५. कार्यक्रम कोड.

६. जाहिरात कोड.

७. नोंदवही ठेवणे.

८. दूरदर्शन वाहिन्यांचे पारेषण अनिवार्य असणे.

९. केबल टेलिव्हिजन नेटवर्कमध्ये मानक सामग्रीचा वापर करणे.

१०. केबल टेलिव्हिजन नेटवर्कद्वारे कोणत्याही दूरसंचार यंत्रणेत हस्तक्षेप न होणे.


### प्रकरण तीन

**विवक्षित सामग्रीची जप्ती व अधिहरण**


११. केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्यासाठी वापरण्यात आलेली सामग्री जप्ती करण्याचा अधिकार.

१२. अधिहरण करणे.

१३. सामग्रीची जप्ती किंवा अधिहरणामुळे अन्य शिक्षेवर परिणाम होणार नाही.

१४. जप्त केलेल्या सामग्रीच्या केबल परिचालकाला संधी देणे.

१५. अपील.


### प्रकरण चार

**अपराध आणि शास्ती**


१६. या अधिनियमाच्या उपबंधाचे उल्लघंन करण्याबाबत शिक्षा.

१७. कंपन्यांचे अपराध.

१८. अपराधांची दखल.


### प्रकरण पाच

**संकीर्ण**


१९. विवक्षित कार्यक्रमांच्या पारेषणास लोकहिताच्या दृष्टिने मनाई करण्याचा अधिकार.

२०. लोकहितासाठी केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

२१. अन्य कायदे लागू होण्यास अवरोध असणार नाही.

२२. नियम करण्याचा अधिकार

२३. निरसन व व्यावृत्ती.

# केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५

**(१९९५ चा अधिनियम क्रमांक ७)**

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान) [२५ मार्च, १९९५]

**देशामधील केबल टेलिव्हिजन नेटवर्कच्या प्रचालनाचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सेहेचाळीसाव्या वर्षी हा अधिनियम संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास, " केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ " असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) तो, दिनांक २९ सप्टेंबर १९९४ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

[१][(क) " प्राधिकृत अधिकारी " याचा अर्थ, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांतर्गत,—

(एक) जिल्हा दंडाधिकारी ; किंवा

(दोन) उप विभागीय दंडाधिकारी ; किंवा

(तीन) पोलीस आयुक्त,

असा आहे.

आणि त्यात केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने **राजपत्रामध्ये** अधिसूचित केलेला त्या शासनाकडून निर्धारित करण्यात येईल अशा अधिकारितेच्या स्थानिक सीमांकरिता प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी, यांचा समावेश होतो ;]

[२][(कक)] " केबल परिचालक " याचा अर्थ, जी व्यक्ती केबल टेलिव्हिजन नेटवर्कमार्फत केबल सेवा पुरविते किंवा अन्यथा तिचे नियंत्रण करते किंवा टेलिव्हिजन नेटवर्कच्या व्यवस्थापनासाठी आणि प्रचालनासाठी जबाबदार असेल अशी व्यक्ती, असा आहे ;

(ख) " केबल सेवा " याचा अर्थ, केबलद्वारा, कार्यक्रमांचे पारेषण, असा असून त्यात कोणत्याही प्रसारणासंबंधी टेलिव्हिजन संकेतांच्या पुनःपारेषणाचा समावेश आहे ;

(ग) " केबल टेलिव्हिजन नेटवर्क " याचा अर्थ, विविध अभिदात्यांना कार्यक्रम बघता यावा म्हणून केबल सेवा पुरविण्याकरिता रचना केलेली अशी, संवृत्त पारेषण पथाचा संच आणि सहयोगी संकेत निर्मिती, नियंत्रण आणि वितरण या बाबी मिळून तयार झालेली यंत्रणा, असा आहे ;

(घ) " कंपनी " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ३ मध्ये व्याख्या केलेली कोणतीही कंपनी, असा आहे ;

(ङ) " व्यक्ती " याचा अर्थ,—

(एक) भारताचा नागरिक असलेली कोणतीही व्यक्ती ;

(दोन) भारताचे नागरिक असलेल्या व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींचा निकाय— मग तो निगमित असो किंवा नसो ;

(तीन) ज्या कंपनीचा भरणा झालेल्या भागभांडवलाच्या एकावन्न टक्क्यांपेक्षा कमी नाहीत इतके भागभांडवल भारतीय नागरिकांनी धारण केलेले आहे अशी कंपनी, असा आहे ;

(च) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या नियमाद्वारे विहित, असा, आहे ;

---

१. २००० चा अधिनियम ३६, कलम २ द्वारे दाखल केले (१ सप्टेंबर २००० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंडाला नव्याने क्रमांक देण्यात आला (१ सप्टेंबर २००० रोजी व तेव्हापासून).

(छ) " कार्यक्रम " याचा अर्थ, कोणतेही टेलिव्हिजन प्रसारण असा असून त्यात,—

(एक) चित्रपट, फिचर, नाटके, जाहिराती आणि मालिका यांचे व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर किंवा व्हिडिओ कॅसेट प्लेअर्सद्वारे प्रदर्शन करणे ;

(दोन) कोणत्याही दृक किंवा श्राव्य किंवा दृक-श्राव्य कार्यक्रमाचे थेट सादरीकरण किंवा सादरीकरण,

यांचा समावेश आहे आणि " कार्यक्रम सेवा " या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावला जाईल ;

(ज) " नोंदणी प्राधिकरण " याचा अर्थ, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ह्या अधिनियमाखालील नोंदणी प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता विनिर्दिष्ट करील असे नोंदणी प्राधिकरण, असा आहे ;

(झ) " अभिदाता " याचा अर्थ, जिला तिने केबल परिचालकाला दाखवून दिलेल्या जागेत केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे संकेत ते पुढे अन्य कोणत्याही व्यक्तीकडे पारेषण न होता प्राप्त करता येतात अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे.

## प्रकरण दोन

## केबल टेलिव्हीजन नेटवर्कचे विनियमन

**केबल टेलिव्हिजन नेटवर्कची नोंदणी केल्याखेरीज प्रचालन न करणे.**

**३.** कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये केबल परिचालक म्हणून नोंदणीकृत असल्याखेरीज केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करणारी व्यक्ती, अशा प्रारंभापासून नव्वद दिवसांच्या कालावधीकरिता असे प्रचालन चालू ठेवील ; आणि उक्त कालावधीत तिने जर कलम ४ खाली नोंदणी प्राधिकरणाकडे केबल चालक म्हणून नोंदणीसाठी अर्ज केला असेल तर, त्या कलमाखाली तो नोंदणीकृत होईपर्यंत किंवा त्या कलमाखाली त्याची नोंदणी करण्याचे, नोंदणी प्राधिकरणाने नाकारीपर्यंत ती असे प्रचालन चालू ठेवील.

**केबल परिचालक म्हणून नोंदणी.**

**४.** (१) केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करणारी किंवा प्रचालन करण्यास इच्छूक आहे अशी कोणतीही व्यक्ती केबल परिचालक म्हणून नोंदणी करण्यासाठी, नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करू शकेल ;

(२) पोटकलम (१) खालील अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा फीसह करण्यात येईल ;

(३) असा अर्ज, नोंदणी प्राधिकरणास, प्राप्त झाल्यानंतर, अर्जदाराने सर्व आवश्यक माहिती दिलेली असल्याबाबत नोंदणी प्राधिकरण स्वतः खात्री करून घेईल व अशी खात्री झाल्यानंतर त्या अर्जदाराची केबल परिचालक म्हणून नोंदणी करील आणि त्याला अशा नोंदणीचे प्रमाणपत्र देईल :

परंतु, कलम २, खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्ती अर्जदाराने पूर्ण केलेल्या नाहीत अशी नोंदणी प्राधिकरणाची खात्री झाल्यास, त्या अर्जदाराची नोंदणी करण्याचे नाकारील आणि त्याबाबतची लेखी कारणे त्याला कळविण्यात येतील.

**ॲड्रेसेबल यंत्रणा इत्यादींमार्फत कार्यक्रमांचे पारेषण.**

[१][**४क.** (१) केंद्र सरकारची, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबाबत जेव्हा खात्री होईल तेव्हा त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, प्रत्येक केबल परिचालकाला, कोणत्याही सशुल्क वाहिनीचे कार्यक्रम, ॲड्रेसेबल यंत्रणेमार्फत पारेषित किंवा पुनःपारेषित करणे बंधनकारक करता येईल, आणि वेगवेगळी राज्ये, शहरे, नगर किंवा, यथास्थिति, क्षेत्रे यांसाठी वेगवेगळे दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

(२) केंद्र सरकारची, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबाबत जर खात्री पटली तर त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एका किंवा त्याहून अधिक, विनाशुल्क प्रसारण वाहिन्यांचा अंतर्भाव वाहिन्यांच्या पॅकेजमध्ये करून मूलभूत सेवाश्रेणी (बेसिक सर्व्हिस टीयर) निर्माण करण्याचे विनिर्दिष्ट करता येईल ; आणि करमणूक, माहिती, शिक्षण आणि अशा इतर कार्यक्रमांचा अंतर्भाव असणारे कार्यक्रम देण्यासाठी, अशी कोणतीही वाहिनी किंवा एकापेक्षा अधिक वाहिन्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करता येतील.

(३) केंद्र सरकारला, पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत, त्या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी, मूलभूत सेवाश्रेणी निर्माण करण्यासाठी वाहिन्यांच्या पॅकेजमध्ये, किती विनाशुल्क प्रसारण वाहिन्यांचा अंतर्भाव करावा, हे विनिर्दिष्ट करता येईल आणि वेगवेगळी राज्ये, शहरे, नगर किंवा, यथास्थिति, क्षेत्रे यांसाठी वेगवेगळ्या संस्था विनिर्दिष्ट करता येतील.

(४) जर लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबाबत केंद्र सरकारची खात्री पटली तर त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा केबल परिचालकाद्वारे देण्यात येणाऱ्या मूलभूत सेवाश्रेणीत पारेषित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांसाठी अभिदात्यांकडून जास्तीत जास्त किती रक्कम आकारावयाची ते विनिर्दिष्ट करता येईल.

---

[१] २००३ चा अधिनियम २६, कलम २ यांद्वारे हा मजकूर दाखल केला (३१ डिसेंबर २००२ रोजी व तेव्हापासून).

(५) पोटकलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला त्या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी, त्या पोटकलमात निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत, वेगवेगळी राज्ये, शहरे, नगर किंवा, यथास्थिति, क्षेत्रे यांसाठी वेगवेगळी जास्तीत जास्त किती रक्कम आकारावयाची ते विनिर्दिष्ट करता येईल.

(६) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) सुधारणा अधिनियम, २००२ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रकारच्या ग्रहण संचावर (रिसिव्हर सेट), कोणत्याही रीतीने कोणतीही ॲड्रेसेबल यंत्रणा न जोडता कोणत्याही अभिदात्याला मूलभूत सेवाश्रेणीचे कार्यक्रम पाहता येतील.

(७) प्रत्येक केबल परिचालक अशा केबल परिचालकाद्वारे पुरविण्यात येणारी प्रत्येक सशुल्क वाहिनी पाहण्यासाठी वर्गणीचे दर आणि ते कोणत्या नियत कालांतराने भरावायचे त्याबद्दलीची माहिती अभिदात्याला, विहित रीतीने प्रसिद्ध करून कळविल.

(८) केबल परिचालक, केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे संकेत मिळविण्यासाठी कोणत्याही अभिदात्याला, कोणताही विशिष्ट पद्धतीचा ग्रहण संच घेण्याची सक्ती करणार नाही :

परंतु, सशुल्क वाहिन्यांद्वारे पारेषित केले जाणारे कार्यक्रम पाहण्यासाठी अभिदात्याला त्याच्या, ग्रहण संचाशी जोडावयाच्या ॲड्रेसेबल यंत्रणेचा वापर करावा लागेल.

(९) प्रत्येक केबल परिचालक, केंद्र सरकारला विहित नमुन्यात व विहित रीतीने, अशा केबल परिचालकाद्वारे केबल टेलिव्हिजन नेटवर्कमार्फत पुरविण्यात येणाऱ्या केबल सेवांच्या संदर्भात, पुढील बाबींविषयक माहितीचा समावेश असलेला अहवाल सादर करील,—

(एक) वर्गणीदारांची एकूण संख्या ;

(दोन) वर्गणीचे दर ;

(तीन) मूलभूत सेवाश्रेणीत पारेषित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचा किंवा सशुल्क वाहिनीवर पारेषित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा किंवा विशिष्ट कार्यक्रमांचा लाभ घेणाऱ्या अभिदात्यांची संख्या ;

आणि असा अहवाल विहित करण्यात येईल अशा नियत कालांतराने सादर करण्यात येईल आणि त्यात, केबल परिचालकाला कोणत्याही प्रसारकाला काही रक्कम देय असल्यास त्या रकमेचा दरही सामाविष्ट असेल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) " ॲड्रेसेबल यंत्रणा " याचा अर्थ, एक अथवा अधिक इलेक्ट्रॉनिक साधने एकसंघ यंत्रणेत बसवून ज्याच्यामार्फत केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे संकेत एनक्रिप्टेड आणि अनएनक्रिप्टेड रुपात पाठवता येतील, अशी साधने, असा आहे. त्याचे विकोडन अभिदात्याच्या जागेत त्याच्या विनंतीवरून आणि त्याच्या इच्छेनुसार, एक वा अधिक साधनाच्या आधारे, केबल परिचालक अभिदात्यासाठी प्राधिकाराच्या मर्यादेत राहून करील ;

(ख) " मूलभूत सेवाश्रेणी " याचा अर्थ, केबल परिचालक ज्या क्षेत्रात केबल सेवा पुरवित असेल त्या क्षेत्रातील अभिदात्यांना परिचालकाकडून एकाच किंमतीत विनाशुल्क वाहिन्यांची सेवा पुरविली जाणे, असा आहे आणि अशा वाहिन्या, अभिदात्यांना केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, २००२ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्यांच्या विद्यमान ग्रहणसंचावर, कोणत्याही रीतीने त्यास ॲड्रेसेबल यंत्रणा न जोडता पाहता येतील ;

(ग) " वाहिनी " याचा अर्थ, कार्यक्रमाच्या पारेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या वारंवारतांचा संच, असा आहे ;

(घ) केबल टेलिव्हिजन नेटवर्कच्या संकेताच्या संदर्भात " एनक्रिप्टेड " याचा अर्थ, असा संकेत पद्धतशीररीत्या अशा तऱ्हेने बदलणे की, जेणेकरून यथोचित उपकरणाखेरीज तो दुर्बोध ठरेल आणि " ॲनएनक्रिप्टेड " या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल ;

(ङ) केबल टेलिव्हिजन नेटवर्कच्या संदर्भात " विनाशुल्क प्रसारण वाहिनी " याचा अर्थ, ज्या वाहिनीचे कार्यक्रम दिसण्यासाठी अभिदात्याला त्याच्या ग्रहण संचाला कोणतीही ॲड्रेसेबल यंत्रणा जोडावी लागणार नाही, अशी वाहिनी, असा आहे ;

(च) " सशुल्क वाहिनी " यांचा केबल टेलिव्हिजन नेटवर्कच्या संदर्भातील अर्थ ज्या वाहिनीस कार्यक्रम पाहण्यासाठी अभिदात्याला त्याच्या ग्रहण संचाला ॲड्रेसेबल यंत्रणा जोडणे आवश्यक असेल अशी वाहिनी, असा आहे.]

**५.** कोणताही कार्यक्रम विहित कार्यक्रम कोडशी अनुरूप असल्याखेरीज, कोणतीही व्यक्ती, अशा कार्यक्रमाचे **कार्यक्रम कोड.** केबल सेवेच्या माध्यमाद्वारे पारेषण किंवा पुन:पारेषण करणार नाही.

[१][ * * * * * ]

---

[१] २००० चा अधिनियम ३६, कलम ३ यांद्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

**जाहिरात कोड.**

६. कोणतीही विहित जाहिरात कोडशी अनुरूप असल्याखेरीज कोणतीही व्यक्ती केबल सेवेच्या माध्यमाद्वारे अशा कोणत्याही जाहिरातीचे पारेषण किंवा पुन:पारेषण करणार नाही.

[1][ * * * * ]

**नोंदवही ठेवणे.**

७. प्रत्येक केबल परिचालक विहित नमुन्यातील नोंदवही ठेविल व अशा नोंदवहीत महिनाभरात केबल सेवेद्वारा पारेषण किंवा पुन:पारेषण करण्यात येतील अशा कार्यक्रमांच्या संक्षिप्त नोंदी दर्शविण्यात येतील आणि केबल परिचालक अशी नोंदवही उक्त कार्यक्रम प्रत्यक्ष किंवा पुन:पारेषण केल्यापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेवील.

**दूरदर्शन वाहिन्यांचे पारेषण अनिवार्य असणे.**

[2][८. (१) केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) सुधारणा अधिनियम, २००० याच्या प्रारंभापासून, प्रत्येक केबल परिचालक, किमान दोन पार्थिव दूरदर्शन वाहिन्यांचे आणि राज्याच्या प्रादेशिक भाषेमधील एका वाहिनीचे, पार्थिव वारंवारता वाहून नेणाऱ्यांव्यतिरिक्त इतर वारंवारतांवरून उपग्रहाच्या मार्गाने मुख्य बँडमध्ये पुन:पारेषण करील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या दूरदर्शन वाहिन्यांचे, अशा वाहिन्यांवर पारेषित करण्यात येणारा कोणताही कार्यक्रम न वगळता किंवा त्यात फेरफार न करता, पुन:पारेषण करण्यात येईल.

(३) प्रसार भारती (भारतीय प्रसारण महामंडळ) अधिनियम, १९९० (१९९० चा २५) याच्या कलम ३, पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेली प्रसार भारती (भारतीय प्रसार महामंडळ), **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, केबल परिचालकांनी त्यांच्या केबल सेवेमध्ये पुन्हा पारेषित करावयाच्या प्रत्येक दूरदर्शन वाहिनीचा क्रमांक आणि नाव विनिर्दिष्ट करील."]

**केबल टेलिव्हिजन नेटवर्कमध्ये मानक सामग्रीचा वापर करणे.**

९. कोणताही केबल परिचालक, भारतीय मानक केंद्र अधिनियम, १९८६ याच्या उपबंधांच्या अनुसार, भारतीय मानक केंद्राकडून भारतीय मानके प्रस्थापित झाल्याच्या आणि ती प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकास व तेव्हापासून, त्याच्या केबल टेलिव्हिजन नेटवर्कसाठी कोणतीही सामग्री, ती उक्त भारतीय मानकांशी अनुरूप असल्याखेरीज, वापरणार नाही :

[3][ परंतु, कलम ४क च्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली सामग्री, केबल परिचालक, त्याच्या केबल टेलिव्हिजन नेटवर्कमध्ये, त्या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, उक्त प्रयोजनासाठी असलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदींअनुसार बसवील."]

**केबल टेलिव्हिजन नेटवर्कद्वारे कोणत्याही दूरसंचार यंत्रणेत हस्तक्षेप न होणे.**

१०. प्रत्येक केबल परिचालक, त्याच्याकडून प्रचालित केल्या जाणाऱ्या केबल टेलिव्हिजन नेटवर्कमुळे प्राधिकृत दूरसंचार यंत्रणेच्या कार्यात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप होत नाही, याची खात्री करून घेईल.

## प्रकरण तीन

## विवक्षित सामग्रीची जप्ती व अधिहरण

**केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्यासाठी वापरण्यात आलेली सामग्री जप्त करण्याचा अधिकार.**

११. [4][(१) कोणत्याही केबल परिचालकाने कलमे [5][३, ४क,] ५, ६ किंवा ८ च्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा करीत आहे असे मानण्यास कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास सयुक्तिक कारण असेल तर, तो केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्याकरिता, त्या परिचालकाने वापरलेली सामग्री ताब्यात घेईल.]

(२) प्राधिकृत अधिकारी जप्तीच्या दिनांकापासून दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी ती सामग्री ज्या जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारिता क्षेत्रामध्ये जप्त करण्यात आली असेल, त्या जिल्हा न्यायाधीशाची, ती सामग्री रोखून ठेवण्यासाठी मान्यता घेतल्याशिवाय, रोखून ठेवणार नाही.

---

[1] २००० चा अधिनियम ३६, कलम ४ याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

[3] २००३ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (३१ डिसेंबर, २००२ रोजी व तेव्हापासून).

[4] २००० चा अधिनियम ३६, कलम ६ द्वारे हा मजकूर दाखल केला (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

[5] २००३ चा अधिनियम २, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला (३१ डिसेंबर, २००२ रोजी व तेव्हापासून).

**अधिहरण करणे.**

**१२.** कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये जप्त केलेली सामग्री, उक्त सामग्री जप्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत केबल परिचालकाने कलम ४ अन्वये केबल परिचालक म्हणून स्वत:ची नोंदणी केली नाही तर, अधिहरण करण्यास पात्र असेल.

**सामग्रीची जप्ती किंवा अधिहरणामुळे अन्य शिक्षेवर परिणाम होणार नाही.**

**१३.** कलम ११ किंवा कलम १२ मध्ये उल्लेखिण्यात आलेली कोणतीही जप्ती किंवा अधिहरण यामुळे या अधिनियमाच्या उपबंधाखाली शिक्षेस पात्र ठरलेल्या व्यक्तीला शिक्षा देण्यास कोणताही प्रतिबंध होणार नाही.

**जप्त केलेल्या सामग्रीच्या केबल परिचालकाला संधी देणे.**

**१४.** (१) कलम १२ मध्ये उल्लेखिलेल्या सामग्रीच्या अधिहरणाच्या अभिनिर्णयाचा कोणताही आदेश, केबल परिचालकाला अशा सामग्रीचे अधिहरण करण्याबाबतच्या कारणाची लेखी माहिती देणारी नोटीस देण्यात आल्याशिवाय आणि त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा उचित कालावधीत त्याला त्या अधिहरणाविरुद्ध आपले म्हणणे लेखी स्वरूपात मांडण्याची योग्य संधी देण्यात आल्याशिवाय आणि जर त्याला स्वत:ला काही सांगावयाची इच्छा असल्यास ते त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय देण्यात येणार नाही :

परंतु, त्या सामग्रीच्या जप्तीच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या कालावधीत अशी नोटीस देण्यात आली नसल्यास तो कालावधी संपल्यानंतर, ती सामग्री ज्याच्याकडून जप्त करण्यात आली होती, त्या केबल परिचालकास परत करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) यांचे उपबंध, शक्य होईल तितपत, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या प्रत्येक कार्यवाहीस लागू होतील.

**अपील.**

**१५.** (१) सामग्रीच्या अधिहरणाचा अभिनिर्णय देणाऱ्या कोणत्याही न्यायालयाच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा न्यायालयाच्या निर्णयावर ज्या न्यायालयात अपील होऊ शकत असेल त्या न्यायालयाकडे अपील करू शकेल.

(२) अपील न्यायालय, अपीलकाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, ज्याच्या विरुद्ध अपील करण्यात आलेले आहे त्या निर्णयाला पुष्टी देणारा किंवा त्यात फेरबदल करणारा किंवा सुधारणा करणारा त्याच्या मते योग्य वाटेल असा आदेश देईल किंवा ते प्रकरण आवश्यक तो अतिरिक्त पुरावा घेऊन त्याच्या मते योग्य वाटतील अशा निदेशांसह नव्याने निर्णय किंवा, यथास्थिति, अभिनिर्णय घेण्यासाठी परत पाठवील.

(३) पोटकलम (२) खाली करण्यात आलेल्या न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येणार नाही.

## प्रकरण चार

## अपराध आणि शास्ती

**या अधिनियमाच्या उपबंधांचे उल्लंघन करण्याबाबत शिक्षा.**

**१६.** [१][(१)] जो कोणी, या अधिनियमाच्या उपबंधाचे उल्लंघन करील तो,—

(क) पहिल्या अपराधासाठी, दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या, कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस ;

(ख) नंतरच्या प्रत्येक अपराधासाठी, पाच वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल ;

[२][(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ४क चे उल्लंघन केल्यास तो या कलमान्वये दखलपात्र अपराध असेल.].

---

[१] २००३ चा अधिनियम २, कलम ५ द्वारे मूळ कलम १६ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (३१ डिसेंबर २००२ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (३१ डिसेंबर २००२ रोजी व तेव्हापासून).

(शा.म.मु.) एच ४०६१—२ (१०३५—५-०७)

**कंपन्यांचे अपराध**

**१७.** (१) या अधिनियमाखालील अपराध जेव्हा एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालवण्याबद्दल कंपनीची प्रभारी म्हणून असलेली आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये यासाठी तिने सर्व वाजवी खबरदारी घेतली होती, असे शाबीत केल्यास या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवली जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो, कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडला असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारीसुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—**

या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात एखादी पेढी किंवा व्यक्तींचा अन्य अधिसंघ अंतर्भूत आहे ; आणि

(ख) पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

**अपराधांची दखल.**

**१८.** [१][कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्याने] लेखी तक्रार केल्याखेरीज या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची, न्यायालय दखल घेणार नाही.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

**विवक्षित कार्यक्रमांच्या पारेषणास लोकहिताच्या दृष्टीने मनाई करण्याचा अधिकार.**

**१९.** [२][कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास,] [३][कोणत्याही कार्यक्रम किंवा वाहिनी जर कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विहित कार्यक्रम कोडशी किंवा कलम ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विहित जाहिरात कोडशी अनुरुप नसेल, किंवा] विवक्षित कार्यक्रमाच्या पारेषणामुळे धार्मिक, वांशिक, भाषिक, जातीय किंवा सामाजिक किंवा इतर कोणत्याही कारणावरून विविध वांशिक, भाषिक, किंवा प्रादेशिक गटांमध्ये, जातींमध्ये किंवा समाजामध्ये अशांती, शत्रुत्वभाव, द्वेष किंवा तणाव निर्माण होण्याचा संभव असेल किंवा सार्वजनिक प्रशांततेचा भंग होण्याचा संभव असेल तर, लोकहिताच्या दृष्टीने त्यास तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटल्यास, अशा विवक्षित कार्यक्रमांचे पारेषण करण्यास किंवा पुनःपारेषण करण्यास केबल परिचालकांना आदेशाद्वारे मनाई करू शकेल.

**लोकहितासाठी केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्यास मनाई करण्याचा अधिकार.**

**२०.** [४][(१)] जेव्हा केंद्र सरकारला लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटेल तेव्हा, ते **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे यासंदर्भात विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्रात टेलिव्हिजन, नेटवर्कचे, प्रचालन करण्यास मनाई करू शकेल.

[५][ (२) जेव्हा केंद्र सरकारला,—

(एक) भारताची सार्वभौमता किंवा एकात्मकता ; किंवा

(दोन) भारताची सुरक्षा ; किंवा

(तीन) कोणत्याही परकीय राज्याशी भारताचे मैत्रीचे संबंध ; किंवा

(चार) जनादेश, सभ्यता किंवा नैतिकता याच्या हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटेल तेव्हा त्यास आदेशाद्वारे कोणत्याही वाहिनीचे किंवा कार्यक्रमाचे पारेषण किंवा पुनःपारेषण विनियमित करता येईल किंवा त्यास प्रतिबंध करता येईल.

(३) कोणत्याही वाहिनीचे कोणतेही कार्यक्रम हे १ कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विहित कार्यक्रमाच्या कोडशी किंवा कलम ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विहित जाहिरात कोडशी अनुरूप नाहीत असे केंद्र सरकारला वाटल्यास, त्यास, आदेशाद्वारे अशा कार्यक्रमाचे पारेषण किंवा पुनःपारेषण विनियमित करता येईल किंवा त्यास प्रतिबंध करता येईल. ]

---

[१] २००० चा अधिनियम ३६, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ सप्टेंबर २००० रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ सप्टेंबर २००० रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ सप्टेंबर २००० रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ कलम २० ला त्या करलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला. (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

**अन्य कायदे लागू होण्यास अवरोध असणार नाही.**

**२१.** या अधिनियमाचे उपबंध, औषधिद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम, १९४० (१९४० चा २३), औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ (१९४८ चा ८), बोधचिन्ह व नाव (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५० (१९५० चा १२), औषधिद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम, १९५० (१९५० चा २६), चलचित्र अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३७), औषधिद्रव्य व चमत्कारिक उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम, १९५४ (१९५४ चा २१), अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७), बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४२), कॉपिराईट अधिनियम, १९५७ (१९५७ चा १४), व्यापारी व पण्य माल चिन्हे अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४३), स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६०), आणि उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६८) या व्यतिरिक्तचे असतील व ते त्यांचे अल्पीकरण करणारे नसतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

**२२.** (१) केंद्र करकारला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (२) खालील अर्जाचा नमुना व देय फी ;

[१][(कक) कलम ४क च्या पोटकलम (७) अन्वये वर्गणीचे दर प्रसिद्ध करण्याची रीत आणि ज्या कालांतराने अशी वर्गणी प्रदान करावयाची ते कालांतर ;]

(ककक) कलम ४क च्या पोटकलम (९) अन्वये अहवाल सादर करण्याचा नमुना व रीत आणि त्या पोटकलमान्वये ज्या नियतकालाने असा अहवाल सादर करावयाचा ते कालांतर ;]

(ख) कलम ५ खालील कार्यक्रम कोड ;

(ग) कलम ६ खालील जाहिरात कोड ;

(घ) कलम ७ खाली, केबल परिचालकाने ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना ;

(ङ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिती, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

**२३.** (१) केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अध्यादेश, १९९५ (१९९५ चा ३) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, अशा उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कारवाई ही या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधान्वये करण्यात आलेली कृती किंवा कारवाई असल्याचे समजण्यात येईल.

---

१ २००३ चा अधिनियम २, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (३१ डिसेंबर २००२ रोजी व तेव्हापासून).

# THE CABLE TELEVISION NETWORK (REGULATION) ACT, 1995

## केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| aggrieved | व्यथित | [sec. 15 (1)] |
| associate | सहयोगी | [sec. 2(b)] |
| association of individuals | व्यक्तींचा संघ | [sec. 2 (e)(II)] |
| basic service tier | मूलभूत सेवाश्रेणी | [sec 4a (2)] |
| body of individuals | व्यक्तीचा निकाय | [sec. 2 (e)(II)] |
| broadcast | पुनःपारेषण | [sec. 2 (b)] |
| cable operator | केबल परिचालक | [sec. 2aa] |
| channel | वाहिनी | [sec. 4a exp.(c)] |
| closed transmission path | संवृत्त पारेषण पथ | [sec 2 (c)] |
| community | सामाजिक | [sec. 19] |
| confirm | पुष्टी देणे | [sec. 15 (2)] |
| confiscation | अधिहरण | [chapter three-title] |
| connivance | मूकानुमती | [sec. 17 (2)] |
| consent | संमती | [sec. 17 (2)] |
| contravention | उल्लंघन | [sec. 16] |
| corresponding | समनुरूप | [sec. 23 (2)] |
| decency | सभ्यता | [sec. 20 (2) (IV)] |
| decode | विकोडन | [sec. 4a, exp. (a)] |
| disharmony | अशांती | [sec. 19] |
| distribution | वितरण | [sec 2 (c)] |
| due diligence | वाजवी खबरदारी | [sec. 17 (1)] |
| enmity | शत्रुत्व भाव | [sec. 19] |
| exhibition | प्रदर्शन | [sec. 2 (9) (i)] |
| free-to-air | विनाशुल्क प्रसारण | [sec. 4a, exp. (e)] |
| frequency | वारंवारता | [sec. 4a, exp. (e)] |
| hatred | द्वेष | [sec. 19] |
| ill-will | तणाव | [sec. 19] |
| imprisonment | कारावास | [sec. 16 (a) ] |
| incidental | आनुषंगिक | [preamble] |
| incorporated | निगमित | [sec. 2(e)(II)] |

| | | |
|---|---|---|
| In particular, and without prejudice to the generality of the foregoing power. | विशेषत: आणि पूर्वगामी अधिकारांच्या व्यापकतेला बाध न येता | [sec. 22 (2)] |
| integrity | एकात्मकता | [sec. 20 (2)(i)] |
| jurisdiction | अधिकारिता | [sec. 2 (a)] |
| linguistic | भाषिक | [sec. 19] |
| morality | नैतिकता | [sec. 20 (2)(iv)] |
| multiple | विविध | [sec. 2 (c)] |
| negligence | हयगय | [sec. 16 (2)] |
| operation | प्रचालन | [preamble] |
| pay channel | सशुल्क वाहिनी | [sec. 8a (7)] |
| periodical | नियतकालिक | [sec. 22 (2) (aa)] |
| periodical intervals | कालांतर | [sec. 22 (2)(aa)] |
| public interest | लोकहित | [sec. 19] |
| public order | जनादेश | [sec. 20 (2)(iv)] |
| public tranquillity | सार्वजनिक प्रशांतता | [sec. 19] |
| receiver set | ग्रहण संच | [sec. 4a (8)] |
| racial | वांशिक | [sec. 19] |
| religious | धार्मिक | [sec. 19] |
| re-transmission | पुन: पारेषण | [sec. 2 (b)] |
| seizure | जप्ती | [chapter three-title] |
| service tier | सेवाश्रेणी | [sec. 4a (2)] |
| set | संच | [sec. 2 (c)] |
| signal | संकेत | [sec. 2 (b)] |
| signal generation | संकेत निर्मिती | [sec. 2 (c)] |
| sovereignty | सार्वभौमता | [sec. 20 (2) (i)] |
| standard equipment | मानक सामग्री | [sec. 9 m.n] |
| subscriber | अभिदाता | [sec. 2 (c)] |
| telecommunication system | दूरसंचार यंत्रणा | [sec. 10] |
| terrestrial | पार्थिव | [sec. 8 (i)] |
| transmission | पारेषण | [sec. 2 (b)] |
| within local limit | स्थानिक सीमांतर्गत | [sec. 2 (a)] |

## केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५

## THE CABLE TELEVISION NETWORKS (REGULATION) ACT, 1995

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकारिता | jurisdiction | [कलम २ (क)] |
| अधिहरण | confiscation | [प्रकरण तीन-शीर्षक] |
| अभिदाता | subscriber | [कलम २ (ग)] |
| अशांती | disharmony | [कलम १९] |
| आनुषंगिक | incidental | [उद्देशिका] |
| उल्लंघन | contravention | [कलम १६] |
| एकात्मकता | integrity | [कलम २० (२)(एक)] |
| कारावास | imprisonment | [कलम १६ (क)] |
| कालांतर | periodical intervals | [कलम २२ (२)(कक)] |
| केबल परिचालक | cable operator | [कलम २ कक] |
| ग्रहण संच | receiver set | [कलम ४ क (२)] |
| जनादेश | public order | [कलम २० (२) (चार)] |
| जप्ती | seizure | [प्रकरण तीन-शीर्षक] |
| तणाव | ill-will | [कलम १९] |
| दूरसंचार यंत्रणा | telecommunication system | [कलम १०] |
| द्वेष | hatred | [कलम १९] |
| धार्मिक | religious | [कलम १९] |
| निगमित | incorporated | [कलम २ (ङ) (दोन)] |
| नियतकालिक | periodical | [कलम २२ (२) (कक)] |
| नैतिकता | morality | [कलम २० (२) (चार)] |
| पारेषण | transmission | [कलम २ (ख)] |
| पार्थिव | terrestrial | [कलम ८ (१)] |
| पारेषण | broadcast | [कलम २ (ख)] |
| पुनःपारेषण | re-transmission | [कलम २ (ख)] |
| पुष्टी देणे | confirm | [कलम १५ (२)] |
| प्रचालन | operation | [उद्देशिका] |
| प्रदर्शन | exhibition | [कलम २ (छ) दोन] |
| भाषिक | linguistic | [कलम १९] |
| मानक सामग्री | standard equipment | [कलम ९ स.टी.] |
| मुकानुमती | connivance | [कलम १७ (२)] |

| | | |
|---|---|---|
| मूलभूत सेवाश्रेणी | basic service tier | [कलम ४क (२)] |
| लोकहित | public interest | [कलम १९] |
| वाजवी खबरदारी | due diligence | [कलम १७ (१)] |
| वारंवारता | frequency | [कलम ४क, स्पष्टी (ग)] |
| वाहिनी | channel | [कलम ४क, स्पष्टी (ग)] |
| विकोडन | decode | [कलम ४क स्पष्टी (क)] |
| वितरण | distribution | [कलम २(ग)] |
| विनाशुल्क प्रसारण वाहिनी | free-to-air channel | [कलम ४क, स्पष्टी (इ)] |
| विविध | multiple | [कलम २(ग)] |
| विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या व्यापकतेला बाधा न येता | In particular, and without prejudice to the generality of the forgoing power. | [कलम २२ (२)] |
| व्यक्तींचा निकाय | body of individuals | [कलम २(ड)] |
| व्यक्तींचा संघ | association of individuals | [कलम २ (ड) (दोन)] |
| व्यथित | aggrieved | [कलम १५ (१)] |
| वांशिक | racial | [कलम १९] |
| शत्रुत्वभाव | enmity | [कलम १९] |
| सभ्यता | decency | [कलम २० (२) (चार)] |
| समनुरूप | corresponding | [कलम २३ (२)] |
| सशुल्क वाहिनी | pay channel | [कलम ४क (७)] |
| सहयोगी | associate | [कलम २ (ख)] |
| सामाजिक | community | [कलम १९] |
| सार्वजनिक प्रशांतता | public tranquillity | [कलम १९] |
| सार्वभौमता | sovereignty | [कलम २० (२) (एक)] |
| सेवाश्रेणी | service tier | [कलम ४क (२)] |
| संकेत | signal | [कलम २ (ख)] |
| संकेत निर्मिती | signal generation | [कलम २ (ग)] |
| संच | set | [कलम २ (ग)] |
| संमती | consent | [कलम १७ (२)] |
| संवृत्त पारेषण पथ | closed transmission path | [कलम २ (ग) ] |
| स्थानिक सीमांतर्गत | within local limit | [कलम २ (क)] |
| हयगय | negligence | [कलम १७ (२)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई